**नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (NIFT), मुंबई या संस्थेसाठी "राज्यस्तरीय सल्लागार समिती" (State Level Advisory Committee - SLAC) गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:E-१७६००३२ HTED-११०११(११)/३१/२०२६-MHT-(TE-२)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक: २४ .०८.२०२६**

**प्रस्तावना:**

नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (NIFT) ही भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अधिपत्याखालील 'निफ्ट अधिनियम, २००६' अंतर्गत स्थापन करण्यात आलेली एक वैधानिक स्वायत्त संस्था आहे. निफ्टच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्स (BoG) ने दि. २९.११.२०२५ रोजी झालेल्या ६६ व्या बैठकीत आणि दि. २१.०३.२०२६ रोजी झालेल्या ६७ व्या बैठकीत प्रत्येक राज्यात जेथे निफ्ट कॅम्पस कार्यरत आहे, तेथे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली "राज्यस्तरीय सल्लागार समिती" (State Level Advisory Committee - SLAC) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत निफ्ट मुख्यालयाचे मार्गदर्शक पत्र दि. २३.०२.२०२६ व दि. ०७.०४.२०२६ अन्वये समितीच्या संरचनेबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. सबब, राज्यातील नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (NIFT),मुंबई कॅम्पसच्या विकासासाठी, पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी व उद्योगक्षेत्राशी समन्वय साधण्यासाठी राज्यस्तरीय सल्लागार समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (NIFT), मुंबई येथील कॅम्पसच्या शैक्षणिक, आर्थिक व पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी आणि राज्य सरकार व उद्योग क्षेत्राशी समन्वय प्रस्थापित करण्यासाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे "राज्यस्तरीय सल्लागार समिती" (State Level Advisory Committee - SLAC) गठीत करण्यास शासन मंजुरी देत आहे:-

| अ.क्र. | समितीची रचना | अध्यक्ष / सदस्य |
|---|---|---|
| १ | मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त अथवा वाणिज्य व उद्योग) किंवा मा.मुख्य सचिव यांनी नामनिर्देशित केलेले कोणत्याही विभागाचे सचिव | पदसिद्ध सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३ | प्रतिनिधी ( शिक्षण क्षेत्र/तांत्रिक संस्था) (२) | महासंचालक (राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्था) यांचेमार्फत नामनिर्देशित सदस्य |
| ४ | प्रतिनिधी (उद्योग क्षेत्र) | कॅम्पस संचालक (राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्था) यांचेमार्फत नामनिर्देशित सदस्य |
| ५ | महासंचालक (राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्था) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | संबंधित कॅम्पस संचालक (राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्था) | सदस्य सचिव |

**२. समितीची कार्यकक्षा -**

१. कॅम्पसच्या उभारणी आणि विकासाशी संबंधित मुद्द्यांवर विचार करणे, ज्यामध्ये प्रकल्पासाठी योग्य बांधकाम संस्थेची निवड करणे (लागू असल्यास) आणि निधीची आवश्यकता, निधीचे वितरण, त्याचा वापर आणि कालमर्यादा इत्यादी सर्व आर्थिक बाबींचा निपटारा करणे समाविष्ट आहे.

२. निफ्ट कॅम्पसच्या विकासासाठी मार्गदर्शन आणि सल्ला देणे.

३. राज्यस्तरीय सल्लागार समिती' (SLAC) खालील बाबींमध्ये निफ्ट कॅम्पससाठी सल्लागाराची भूमिका बजावेल:

I. विविध कार्यक्रम, प्रकल्प आणि इतर शैक्षणिक उपक्रमांसाठी निधी गोळा करणे.
II. संबंधित क्षेत्रातील (प्रादेशिक) उद्योगांशी जवळचे संबंध आणि समन्वय विकसित करणे.
III. मंजूर महसुली अर्थसंकल्पाच्या (Revenue Budget) मर्यादेत कॅम्पस प्रभावीपणे चालवण्यासाठी उपाय आणि मार्ग सुचवणे.
IV. शैक्षणिक कार्यक्रमांवर लक्ष ठेवणे आणि त्याबाबत निफ्ट कॅम्पसला सल्ला देणे.
V. सर्व व्यासपीठांवर निफ्टची (NIFT) एक 'उत्कृष्ट संस्था' (Institute of Excellence) म्हणून जाहिरात आणि प्रसार करणे.
VI. राज्य सरकारांनी निफ्टला दिलेल्या वचनबद्धतेची/आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी त्यांच्याशी समन्वय साधणे आणि भविष्यातील सहकार्यासाठी त्यांचा पाठिंबा मिळवणे.

३. राज्यस्तरीय सल्लागार समिती (SLAC) ची बैठक दर तिमाहीत (३ महिन्यातून) एकदा किंवा आवश्यकतेनुसार अध्यक्षांच्या सूचनेनुसार अधिक वेळा आयोजित केली जाईल.

४. राज्यस्तरीय सल्लागार समितीचा कार्यकाळ हा समितीच्या स्थापनेपासून तीन वर्षांचा असेल.

५. या समितीवरील अशासकीय सदस्य/तज्ञ प्रतिनिधी यांना भत्ते किंवा इतर खर्च देय असल्यास, तो खर्च निफ्ट (NIFT) मुंबई कॅम्पसच्या स्वनिधीतून भागविण्यात यावा. यासाठी राज्य शासनाकडून कोणताही अतिरिक्त आर्थिक भार उचलला जाणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२४१५१६०८५२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

A S MUTYAL

Digitally signed by A S MUTYAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=daee80ec44e60c590272017d95394b0b605cfddee15c8895212ac4add74386f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEC50BCA597E7B3FD46D9282C52300269EB689D8C130253FCE76651562083F8B, cn=A S MUTYAL
Date: 2026.08.24 15:16:56 +05'30'

**(अ.शा.मुत्याल)**
**उपसचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य , मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
७. अपर मुख्य सचिव , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त /नियोजन/उद्योग विभाग), मंत्रालय, मुंबई.
९. महासंचालक, निफ्ट (NIFT) मुख्यालय, नवी दिल्ली.
१०.कॅम्पस संचालक, राष्ट्रीय फॅशन प्रौद्योगिकी संस्थान (NIFT), मुंबई.
११.निवड नस्ती (तांशि-२).